# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 26.11.2022** **वारः शनिवार**

---

**ठळक बातम्या**

1 संविधान दिनानिमित्त पंतप्रधान ई-कोर्ट प्रकल्पाच्या अंतर्गत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध उपक्रमांचा आरंभ

२. भारत-फ्रान्सदरम्यान आज नवी दिल्ली इथं चौथी संरक्षणविषयक बैठक

3. महाराष्ट्रात पुणे इथल्या लोहगाव विमानतळावर पुढच्या वर्षी मेपर्यंत नवीन टर्मिनल इमारत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आणि

४. सन 2019, 20 आणि 21 साठी संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची घोषणा; महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांचा समावेश

**संविधान दिन पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 10 वाजता सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या संविधान दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.यावेळी पंतप्रधान ई-कोर्ट प्रकल्पांतर्गत विविध नवीन उपक्रमांचा शुभारंभ करतील. या प्रकल्पाद्वारे याचिकाकर्ते, वकील आणि न्यायव्यवस्था यांना माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाद्वारे सेवा प्रदान करण्यात येईल.व्हर्च्युअल जस्टिस क्लॉक, जस्टिस मोबाईल ॲप 2, डिजिटल कोर्ट आणि S3 वास या संकेतस्थळांचा पंतप्रधान शुभारंभ करणार आहेत.

व्हर्च्युअल जस्टिस क्लॉकमुळे खटल्यांच्या निकालाची स्थिती लोकांबरोबर सामायिक करता येऊन न्यायालयांचं कामकाज उत्तरदायी आणि पारदर्शक होण्यास मदत होईल.जिल्हा न्यायालयाच्या वेबसाइटवर कोणत्याही न्यायालयाचं हे घड्याळ जनतेसाठी उपलब्ध असेल. जस्टिस मोबाईल ॲप 2 द्वारे,उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आता प्रलंबित प्रकरणं आणि त्याच्या निकालावर लक्ष ठेवू शकतील तर डिजीटल कोर्टाद्वारे न्यायालयीन नोंदी डिजीटल स्वरूपात न्यायाधिशांना उपलब्ध करून दिल्या जातील.जिल्हा न्यायव्यवस्थेशी संबंधित माहिती आणि सेवा प्रकाशित करण्यासाठी तसंच या माहितीच्या निर्माण आणि व्यवस्थापनासाठी S3 वास संकेत स्थळं सुरू करण्यात आली आहेत.

महाराष्ट्रात आजच्या संविधान दिनापासून 6 डिसेंबर या महापरिनिर्वाण दिनापर्यंत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं ‘समता पर्वाचं आयोजन केलं आहे.या कालावधीत राज्यात विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.प्रभात फेरी, संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन,तज्ज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन,कार्यशाळा,निबंध स्पर्धा,प्रश्नमंजुषा,यासह विविध कार्यक्रम होणार आहेत.पुण्यात काल संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला 5 हजार दीप प्रज्वलित करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आलं.

**राजनाथ सिंह**

भारत-फ्रान्सदरम्यान चौथ्या संरक्षणविषयक तीन दिवसांच्या परिषदेला आजपासून नवी दिल्ली इथं सुरुवात होत आहे.फ्रान्सचे सशस्त्र दल मंत्री सेबॅस्टिन लेकोर्नू या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी भारत दौऱ्यावर आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह या बैठकीचे सह-अध्यक्ष असणार आहेत.परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचीही लेकोर्नू भेट घेणार आहेत तसंच कोची इथल्या दक्षिणी नौदल कमांड मुख्यालयाला ते भेट देणार असून, भारताची पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका INS विक्रांतची पाहणी करणार आहेत.

**ज्योतिरादित्य शिंदे दौरा**

कला,संस्कृतीचं माहेरघर असलेल्या महाराष्ट्रातील पुण्यात व्यापार,उद्योग,माहिती तंत्रज्ञान आदी क्षेत्रही विकसित झाली आहेत, त्यामुळे पुण्याच्या विकासाला केंद्र सरकारचं प्राधान्य राहील अशी ग्वाही केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल दिली. पुण्यातील लोहगांव विमानतळावर उभारलेल्या एरोमॉल मल्टीलेवल कार पार्किंगचं उदघाटन काल शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,खासदार गिरीश बापट,वंदना चव्हाण,आमदार सुनिल टिंगरे यावेळी उपस्थित होते. लोहगांव विमानतळावरून आता आंतरराष्ट्रीय विमानांची उड्डाणे होऊ लागली असून, अमेरिका आणि युरोपसाठी देखील भविष्यात प्रयत्न करण्यात येतील, लोहगाव विमानतळावर नवीन टर्मिनल इमारतीचं काम सत्तर टक्के पूर्ण झाले असून, पुढच्या वर्षी मेपर्यंत ही नवीन टर्मिनल इमारत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल. इथं इंटिग्रेटेड कार्गो टर्मिनलची देखील सुविधा असेल, येत्या 1 डिसेंबरपासून पुणे सिंगापूर विमान सुरू होईल.अशी माहिती ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली.

**प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा**

केंद्र सरकारनं सुधारित प्राण्यावरील अत्याचार प्रतिबंधक कायदा विधेयक 2022 चा मसुदा प्रकाशित केला असून तो सार्वजनिक सुचनांसाठी खुला आहे. या मसुदयामध्ये 61 दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव

मांडला आहे. क्रूरतेच्या नवीन श्रेणीमध्ये पाशवी वर्तन हा गुन्हा म्हणून समाविष्ट करण्यात आला असून प्राणी मारल्यास जास्तीत जास्त पाच वर्षांच्या कारावासासह किमान ७५ हजार रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे. विधेयकाच्या मसुद्यामध्ये कलम 3अ अंतर्गत तहान, भूक, कुपोषण, भीती आणि त्रासापासून मुक्तीसह प्राण्यांच्या पाच स्वातंत्र्य हक्काचा  समावेश आहे. यामध्ये वन्य प्राणी वगळता असे सामुदायिक प्राणी, ज्यांच्यावर कोणाचाही मालकी हक्क नाही अशा प्राण्यांनाही मान्यता देण्याचाही प्रस्ताव आहे.सामुदायिक प्राण्यांची काळजी घेण्याची जबाबदारी स्थानिक सरकारांची असेल, असं  या मसुद्यात म्हटलं आहे.

**भारतीय बाळ जर्मनी**

जर्मनीमध्ये सध्या संगोपन कक्षात असलेल्या एका भारतीय बाळाचं प्रकरण संवेदनशील स्वरूपाचं असून ते न्यायप्रविष्ट आहे असं परराष्ट्र मंत्रालयानं काल सांगितलं. मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी काल बातमीदारांना सांगितलं की, सरकार एका वर्षाहून अधिक काळापासून या प्रकरणात जर्मन अधिकाऱ्यांशी संवाद साधत आहे. ते म्हणाले की सरकार गोपनीयतेच्या समस्यांबद्दल आणि या प्रकरणाच्या आजूबाजूच्या परिस्थितीच्या संवेदनशील स्वरूपाबद्दल जागरूक आहे. बर्लिनमधील भारतीय दूतावास देखील या कुटुंबाच्या संपर्कात असून न्यायालयीन कार्यवाही लवकर पूर्ण व्हावी यासाठी जर्मन अधिकाऱ्यां समवेत वाटाघाटी चालू आहेत.

**G-20 शिष्टमंडळ**

G-20 शिष्टमंडळ काल दुपारी पोर्ट ब्लेअर इथं भारतातील G20 देशांच्या मंडळ  प्रमुखांच्या चर्चेसाठी आलं आहे. पोर्ट ब्लेअरमध्ये G-20 शिष्टमंडळाचं  जोरदार स्वागत करण्यात आलं. त्यांच्या आगमनानंतर लगेचच शिष्टमंडळानं  राष्ट्रीय स्मारक असलेल्या सेल्युलर जेल या राष्ट्रीय स्मारकाला भेट दिली.माजी परराष्ट्र सचिव आणि G20 चे मुख्य समन्वयक हर्षवर्धन सिंगला,नीती आयोगाचे माजी अध्यक्ष आणि G20 शेर्पा अमिताभ कांत या शिष्टमंडळात सहभागी आहेत. G20 मधील भारताच्या अध्यक्षपदाचा प्रवास पोर्ट ब्लेअरमधील सेल्युलर जेल इथं सुरू होत आहे ही संपूर्ण देशासाठी अत्यंत अभिमानची बाब आहे."आम्ही इथं तुरुंगवास भोगलेल्या आमच्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्याचं आणि सेवेचं स्मरण करतो असं अमिताभ कांत यांनी त्यांच्या ट्विट संदेशात म्हटलं आहे.

**गुजरात निवडणुका**

गुजरातमध्ये पहिल्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराला अवघे चार दिवस उरले असताना सर्व राजकीय पक्षांचे नेते मतदारांना आपल्या बाजूनं करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. गृहमंत्री अमित शहा, स्मृती इराणी,धर्मेंद्र प्रधान,परसोत्तम रुपाला, रविशंकर प्रसाद यांच्यासह भाजप नेते

आणि केंद्रीय मंत्र्यांनी राज्यात जोरदार प्रचार केला.काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शक्तीसिंह गोहिल,रघु शर्मा आणि राजीव शुक्ला यांनी अहमदाबादमध्ये पत्रकार परिषद घेतली तर आपचे ज्येष्ठ नेते राघव चड्ढा,भगवंत मान,मनीष सिसोदिया यांनीही त्यांच्या पक्षाचा प्रचार केला. पत्रकार परिषदेला संबोधित करताना, आपचे नेते मनोज सोरठिया म्हणाले की, ताज्या सर्वेक्षणानुसार त्यांचा पक्ष एक बळकट पर्याय म्हणून स्थान मिळवत आहे.

**कथाकार**

केंद्रीय मंत्री किरण रिजिजू आणि राज्यमंत्री मीनाक्षी लेखी आज नवी दिल्लीत कथाकारच्या 15 व्या सत्राचं उद्घाटन करणार आहेत. हा कार्यक्रम सेंट्रल व्हिस्टा इंडिया गेट इथं आज दुपारी होणार आहे. कथाकथनाचे कार्यक्रम दिल्लीतील सुंदर नर्सरी, हेरिटेज पार्क आणि सेंट्रल व्हिस्टा, इंडिया गेट इथं होणार आहेत.युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया; मंगोलिया; इस्रायल; सिएरा लिओन आणि कोरिया या देशांमधील भारतीय आणि आंतरराष्ट्रीय लेखकांच्या विविध कथा आणि संगीत या महोत्सवात सादर केलं जाईल.

**FIFA विश्वचषक**

FIFA विश्वचषक फुटबॉल 2022 मध्ये, आज रात्री कतारमधील अल बायत स्टेडियमवर इंग्लंड आणि अमेरिका यांच्यातील ब गटातील सामना एकही गोल नं होता  बरोबरीत सुटला. अ गटातील आणखी एका सामन्यात, यजमान कतारला सेनेगलनं ३-१ नं पराभूत केलं. या पराभवामुळे कतार या स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

**संगीत अकादमी**

संगीत नाटक अकादमीने 2019, 2020 आणि 2021 या वर्षांसाठी संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची काल घोषणा केली. या पुरस्कारासाठी 128 कलाकारांची निवड करण्यात आली आहे. तर कला क्षेत्रातील दहा नामवंत व्यक्तींची अकादमी सहध्यायी म्हणून निवड करण्यात आली आहे. अकादमी सहाध्यायींच्या पुरस्काराचं स्वरूप तीन लाख रुपये आहे;तर ताम्रपत्र, शाल आणि  एक लाख रुपये असं अकादमी पुरस्काराचं स्वरूप आहे. हे  पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते एका विशेष समारंभात प्रदान केले जातील.राज्यातील विविध नामवंत कलाकारांचा यात समावेश आहे. प्रसिद्ध शास्त्रीय गायिका मालिनी राजूरकर,आरती अंकलीकर टिकेकर,कथक नृत्य गुरु डॉ नंदकिशोर कपोते, शमा भाटे, प्रसिद्ध अभिनेता प्रशांत दामले, दिग्दर्शक कुमार सोहोनी,कठपुतली कला प्रकारात पारंगत असलेल्या मीना नाईक यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.नमस्कार.**